| | |
|---|---|
| MHNG170006522024 | दाखल तारीख :– ०४.१०.२०२४<br>नोंदणी तारीख :– ०४.१०.२०२४<br>निकाल तारीख :– ०५.०५.२०२६<br>कालावधी :– वर्ष, महीने, दिवस<br>०१, ०७, ०१. |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर**

**(पिठासीन अधिकारी श्री. एस.जे. लाड)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१०६/२०२४** **निशाणी क्र.२०.**

**प्रथम खबर मधील तपशिल :–**

**अपराध क्रमांक** : २३१/२०२४, दिनांक १९.०५.२०२४

**पोलीस स्टेशन** : भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष –** | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ –** | श्री एस. एस. मोरे |
| **आरोपी –** | **१. संदिप अरुण मंदनकर (मय्यत),**<br>**२. राकेश रमेश गेडाम,**<br>वय ३४ वर्षे, व्यवसाय– –,<br>रा. तास ता.भिवापूर, जि.नागपूर. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ –** | श्री. पी.एल.नागोशे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १९.०५.२०२४ |
| गुन्हा दाखल तारीख | १९.०५.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०४.१०.२०२४ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | ०८.१२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २२.१२.२०२५ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | ---- |

## आरोपीचे विवरण

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेल ी शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संदिप अरुण मंदनकर | १९.०५. २०२४ | १९.०५. २०२४ | – | आरोपी मय्यत झाल्यामुळे त्याच्या विरुद्ध प्रकरण बंद करण्यात आले. | – | – |
| २. | राकेश रमेश गेडाम | २८.०५. २०२४ | २८.०५. २०२४ | ३७९, १०९ भा.दं.वि. व सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियमचे कलम ३ | आरोपींना निर्दोष मुक्त | – | – |

## तपासलेले साक्षीदार

अ. अभियोग पक्षातर्फे :-

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | प्रकाश फकीरा धाडसे | घटनास्थळ पंच | ६ |
| सा.क्र.२ | श्रीहरी बंडू कुशराम | घटनास्थळ पंच | ८ |
| सा.क्र.३ | स्वप्नील प्रकाश ठाकरे | फिर्यादी | ९ |

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.४ | प्रफुल विश्वनाथ माहुरे | साक्षीदार | १२ |
| सा.क्र.५ | आनंद रामभाऊ धात्रक | तपास अधिकारी | १५ |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे **:–**

| **अ.क्र.** | **निशाणी** | **पुराव्याचे स्थान** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१० | फिर्याद |
| २. | नि.क्र.११ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ३. | नि.क्र.१३ | समन्स |
| ४. | नि.क्र.१४ | घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा |
| ५. | नि.क्र.१६ | तहसीलदारांना दिलेले पत्र |
| ६. | नि.क्र.१७ | आर.टी.ओ.ला दिलेले पत्र |
| ७. | नि.क्र.१८ | सार्वजनिक बांधकाम विभाग दिलेले पत्र |
| ८. | आर्टिकल अ | अहवाल |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## ड. मुद्देमाल

13 pt

| **अ.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | – | टिप्पर क्र.एम.एच.४०–बी.एल.६१९१ हा ५ ब्रास रेतीसह |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक ५ मे, २०२६ रोजी पारीत)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ आणि १०९ व सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियमचे कलम ३ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता संपरीक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाची संक्षिप्त हकीकत :–**

२. घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी स्वप्नील प्रकाश ठाकरे हे दिनांक १९.०५.२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी ते ठाणेदार निर्मल, पोलीस हवालदार व पोलीस शिपाई यांच्यासह पोलीस स्टेशन भिवापूर पेट्रोलींग तसे अवैध गौण खनिज वाहतुकीस आळा घालणे करिता फिरत असताना मुखबिरद्वारे खबर मिळाली की, एक निळसर रंगाचा दहा चाकी टिप्पर अवैधरित्या रेती भरुन पवनी निलज कडून भिवापूरकडे येत आहे. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना समन्स दिला व तास कॉलोनी येथे असताना तेथे दहा चाकी टिप्पर निलजकडून येताना दिसला. सदर टिप्परवर संशय आल्याने सदर वाहनास थांबविले त्याचा क्र.एम.एच.४०–बी.एल.६१९१ असा होता. सदर टिप्पर चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप अरूण मदनकर असे सांगितले. त्या टिप्परची पाहणी केली असता त्यात रेती आढळून आल्यास सदर चालकास परवाना विचारता त्याने नकार दिला. सदर आरोपीस विचारपूस केली असता त्याने सांगितले की, येनोडा ता.पवनी येथून टिप्परमध्ये विना परवाना रेती भरुन टिप्पर मालक नामे राकेश रमेशजी गेडाम याच्या सांगणेवरुन घेवून जात होता. त्यानंतर पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीचे उपरोक्त आशयाच्या बयानावरुन, आरोपींविरुध्द अपराध क्र.२३१/२०२४ भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९, १०९, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास)

अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा १९८४ चे कलम ३ कायद्यान्वये पोलीस स्टेशन, भिवापूर येथे गुन्ह्याची नोंद केली. पोलीस हवालदार आनंद धात्रक यांच्याकडे तपास सोपविला. त्यांनी तपासा दरम्यान तहसीलदार व आर.टी.ओ. व सार्वजनिक बांधकाम विभागला पत्र दिले व साक्षीदारांचे बयान नोंदवून तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी क्र.१ याला वॉरंट काढल्यानंतर तो मय्यत असल्याचा अहवाल पोलिसांनी दाखल केलेला आहे. त्यामुळे आरोपी क्र.१ विरुद्ध प्रकरण बंद करण्याचा आदेश नि.क्र.१ वर करण्यात आला. चौकशी दरम्यान दोषारोप पत्राचे अवलोकनकरिता असे निदर्शनास आले की, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९, १०९, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा १९८४ चे कलम ३ प्रमाणे आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, परंतु, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ या कायद्यान्वये त्या कायद्यांतर्गत अर्विभूत अधिकाऱ्याने तक्रार देणे आवश्यक असते व त्यानुसार न्यायालयाला खटल्याची दखल घेता येते, परंतु, सदरची फिर्याद ही पोलीस अधिकाऱ्याने दिली असल्यामुळे मी नि.क्र.१ वर आदेश करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ गुन्ह्यांची दखल घेता येत नसल्यामुळे त्याकरिता आदेश करुन मी आरोपींविरुद्ध मी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९, १०९ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा १९८४ चे कलम ३ नुसार नि.क्र.४ वर दोषारोप निश्चीत केला. आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगीतला. आरोपींची जबानी नि.क्र.५ वर नोंदविण्यात आली. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. साक्षीदारांच्या बयानात आरोपींविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत बयान

निशाणी क्रमांक १९ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी खोटी केस असल्याचा बचाव घेतला.

**५.** अभियोग पक्षाचा खटला, आरोपीचा बचाव, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. मोरे व आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एल. नागोशे यांचे युक्तीवादावरुन खालील मुद्दे निर्धारणाकरिता उपस्थीत होतात, त्यांना मी सहकारण निष्कर्ष देत आहे.

**६.** विचारार्थ निर्माण झालेले मुद्दे :–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपींनी समान उद्देशान आपसात संगणमत करुन दिनांक १९.०५.२०२४ रोजी ९.२५ ते ९.५५ वा. दरम्यान तास, ता. भिवापूर, येथे आरोपी क्र.२ याच्या टिप्पर एम.एच.४०–बी.एल.६१९१ मधुन अवैधरित्या गौण खनिज ५ ब्रास रेती शासनाच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे चोरी केली व भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ अन्वये गुन्हा केला काय? | ... | **नकारार्थी.** |
| २. | वरील नमुद ठिकाणी व वेळी आरोपी क्र.२ याने आरोपी क्र.१ याला गौणखनिज विना परवाना वाहतुक करण्यास परावृत्त केले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम १०९ अन्वये गुन्हा केला काय ? | ... | **नकारार्थी.** |
| ३. | वरील नमुद ठिकाणी व वेळी आरोपींनी जाणीवपूर्वक सार्वजनिक मालमत्तेचे हानी करण्याच्या उद्देशाने गौण खनिज चोरी केली व त्यायोगे सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ अन्वये गुन्हा केला काय ? | ... | **नकारार्थी.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | आदेश काय? | ... | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :–**

**७.** अभियोग पक्षाने गुन्हा सिध्दतेकामी एकूण पाच साक्षीदार तपासले. फिर्यादी स्वप्नील प्रकाश ठाकरे (सा.क्र.३) यांना नि.क्र.९ वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.१९.०५.२०२४ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी ते ए.पी.आय.जयप्रकाश निर्मल साहेब, पो.ह. प्रफुल माहुरे, पो.शि. वासुदेव समर्थ यांच्यासह पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत होते. त्यावेळी मुखबीरद्वारे खबर मिळाली की, एक निळ्या रंगाचा टिप्पर विना परवाना रेती घेवून जाणाार आहे. त्यानंतर प्रफुल माहुरे यांनी दोन पंचांना समन्स दिला व तास गावाजवळ सकाळी ९.०० वा. दरम्यान नाकाबंदी केली असता तेथे एक टिप्पर येताना दिसला, त्याला थांबवून त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली. त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०–बी.एल.६१९१ असा होता. त्या टिप्परची पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये ६ ब्रास रेती आढळून आली. चालकाला परवान्याबाबत विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर प्रफुल माहुरे यांनी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला व त्यानंतर त्यांनी फिर्याद दिली. त्यांच्या पुराव्यात फिर्याद नि.क्र.१० व छापील प्रथम खबर अहवाल नि.क्र.११ वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नाकारार्थी उत्तर दिले.

८. त्यानंतर अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच प्रकाश फकीरा धाडसे (सा.क्र.१) याला नि.क्र.६ वर तपासले. त्याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित केले व त्याचा सविस्तर उलट तपास घेतला, परंतु, त्यामध्ये अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काही आले नाही. त्यानंतर अभियोग पक्षाने दुसरा घटनास्थळ पंच श्रीहरी बंडू कुशराम (सा.क्र.२) याला नि.क्र.८ वर

तपासले. त्याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित केले व त्याचा सविस्तर उलट तपास घेतला, परंतु, त्यामध्ये अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काही आले नाही.

९. त्यानंतर अभियोग पक्षाने साक्षीदार प्रफुल विश्वनाथ माहुरे (सा.क्र.४) याला नि.क्र.१२ वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.१९.०५.२०२४ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी ते ए.पी.आय.जयप्रकाश निर्मल साहेब, पो.शि.स्वप्नील ठाकरे, पो.शि. वासुदेव समर्थ यांच्यासह पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत होते. त्यावेळी मुखबीरद्वारे खबर मिळाली की, एक निळ्या रंगाचा टिप्पर विना परवाना रेती घेवून जाणाार आहे. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना समन्स दिला व तास गावाजवळ सकाळी ९.०० वा. दरम्यान नाकाबंदी केली असता तेथे एक टिप्पर येताना दिसला, त्याला थांबवून त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली. त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०–बी.एल.६१९१ असा होता. त्या टिप्परची पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये ६ ब्रास रेती आढळून आली. चालकाला परवान्याबाबत विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर प्रफुल माहुरे यांनी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला त्यांच्या पुराव्यात घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४ वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नाकारार्थी उत्तर दिले.

११. सरतेशेवटी अभियोग पक्षाने तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५) यांना नि.क्र.१५ वर तपासले. त्यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले की, दिनांक १९.०५.२०२४ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून ड्युटीवर होते. त्यादिवशी गुन्हा क्रमांक २२१/२०२३ नोंद झाला होता. प्राथमिक तपास फिर्यादी प्रफुल माहुरे यांनी केले होते. त्याचा तपास त्यांच्याकडे आला. पुढील तपासादरम्यान त्यांनी तहसीलदार, प्रादेशीक परिवहन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पत्र दिले व जप्त केलेल्या रेतीचे वजन केले. त्यांच्या पुराव्यात तहसीलदारांना दिलेले पत्र नि.क्र.१६, आर.टी.ओ.ला दिलेले पत्र नि.क्र.१७ व

सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेले पत्र नि.क्र.१८ व रेतीचे वजनाचा अहवाल आर्टिकल अ वर सिद्ध करण्यात आला. त्यानंतर साक्षीदारांचे बयान नोंदविले व तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी सर्व उत्तरसूचक प्रश्नांना त्यांनी नकारात्मक उत्तर दिले.

**१०.** वर नमुद साक्षीदारांचे बयानांचे अवलोकनकरिता असे निर्देशनास येते की, अभियोग पक्षाने केवळ दोन स्वतंत्र साक्षीदार म्हणजे पंच साक्षीदार प्रकाश फकीरा धाडसे (सा.क्र.१) व श्रीहरी बंडू कुशराम (सा.क्र.२) यांना तपासले. त्या व्यतिरिक्त सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. प्रस्तुत खटल्यात तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५), फिर्यादी स्वप्नील प्रकाश ठाकरे (सा.क्र.३) व साक्षीदार प्रफुल विश्वनाथ माहुरे (सा.क्र.४) यांनी आरोपींवरील गुन्हा सिद्ध करणेकामी केवळ फिर्याद नोंदवून घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला या व्यतिरिक्त तपासामध्ये केवळ साक्षीदारांचे बयान नोंदविलेले आहे. तसेच तहसीलदार व प्रादेशिक परिवहन विभाग यांना पत्र दिलेले आहे. माझ्या मते, तहसीलदार व प्रादेशिक परिवहन विभाग यांना दिलेले पत्र हे त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या कारवाई संदर्भात आहेत. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाला हे सिद्ध करायचे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी हे त्यांचे टिप्परमध्ये विना परवाना रेती चोरी करुन घेऊन जात होते किंवा नाही. त्या अनुषंगाने संपूर्ण अभियोग पक्षाच्या पुराव्यात केवळ घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा यावर भिस्त आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यातील दोन्ही साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच, त्या साक्षीदारांव्यतिरिक्त तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५), फिर्यादी स्वप्नील प्रकाश ठाकरे (सा.क्र.३) व साक्षीदार प्रफुल विश्वनाथ माहुरे (सा.क्र.४) यांनी इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांचे किंवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे बयान नोंदविलेले नाहीत. त्यामुळे घटनेच्या दिवशी जप्त केलेला टिप्पर हा आरोपी क्र.१ चालवत होता व त्यासोबत आरोपी क्र.२ हा समान उद्देशान विना परवाना रेती चोरी करण्यामधे सहभागी होता हे स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिद्ध झालेले नाही.

**११.** अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार आरोपी क्र.२ याने आरोपी क्र.१ याला

रेती चोरी करण्याकरिता प्रेरीत केले होते व तो जप्त केलेला टिप्पर आरोपी क्र.२ याच्या मालकीचा होता, परंतु, ही बाब सिद्ध करणेकरिता तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५) यांनी जप्त केलेला टिप्पर आरोपीचा मालकीचा असल्याचे कोणताही कागदोपत्री पुरावा आणला नाही. त्यामुळे जप्त केलेला टिप्पर हा आरोपी क्र.२ याच्या मालकीचा आहे हे पुराव्यात कुठेही दिसून येत नाही. तसेच, त्याने आरोपी क्र.१ याला रेती चोरी करणेकरिता प्रेरीत केले या संदर्भातही घटनास्थळ वजा जप्त पंचनाम्या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा नाही. त्यामुळे सदर खटल्यात आरोपी क्र.२ याला सदर गुन्ह्याशी जोडण्याकरिता अभियोग पक्षाने कुठलाही पुरवा आणलेला नाही. तसेच आरोपी क्र.२ विरोधात अभियोग पक्षाचा संपूर्ण खटला हा फिर्याद व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा केवळ यावर अवलंबून आहे. त्यामध्येही घटनास्थळ पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे ते देखील स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिद्ध झालेले नाही. त्यामुळे वरील सर्व चर्चेअंती पुरेशा पुराव्या अभावी आरोपीविरुद्ध खटला हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :–**

**१२.** मुद्दा क्रमांक १ ते ३ च्या निष्कर्षावरुन असे दिसून येते की, आरोपी हे निर्दोष होण्यास पात्र आहेत. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

<u>१.</u> आरोपी क्र. २ **राकेश रमेश गेडाम** याला भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९, १०९ व सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियमचे कलम ३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यातून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

<u>२.</u> आरोपीने पुर्वी दिलेले बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

**<u>३.</u>** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रुपये १५,०००/– चा वैयक्तीक जामिन व त्याच रक्कमेचा जामिनदार द्यावा.

**<u>४.</u>** या खटल्यात जप्त असलेला टिप्पर क्रमांक एम.एच.४०–बी.एल.६१९१ हा सुप्रतनाम्यावर परत करण्यात आला असल्यास, सुप्रतनामा बंधपत्र रद्द करण्यात यावा. तसेच, वर नमुद टिप्पर जप्त असल्यास वाहनाच्या नोंदणीकृत मालकास वर नमुद टिप्परचे कागदपत्रांची पडताळणी केल्यावर अपील कालावधीनंतर परत करण्यात यावे.

**<u>५.</u>** खटल्यात जप्त ५ ब्रास रेती तालुका दंडाधिकारी, भिवापूर यांच्याकडे सुपूर्द करुन, त्यांनी नियमानुसार विल्हेवाट करुन प्राप्त रक्कम शासनास जमा करावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.05.05 14:59:18 +0530

भिवापूर.
दिनांक – ०५.०५.२०२६.

(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : Ku. K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.